## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ/६३४६/२०२३/सोलापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| श्री. शाम सुखदेव श्रीरसागर | प्र. सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर |

**( सुनावणी दिनांक- २०/०५/२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. १६/१०/२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपीले दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे वतीने त्यांचे प्रतिनिधी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत तथापि, त्यांचे लेखी निवेदन आयोगाकडे सादर केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २०/०६/२०२३ | ६३४६ - जि.पु.अ. यांचेकडील २०२२ जा.क्र. पुशा/२१(२) आरआर-२९१ आपलेकडून दि. १०/०३/२०२३ अन्वये सदरचे निवेदनाचे निराकरण आपले स्तरावरुन होणे शक्य असल्यास उक्त तक्रारीबाबत आवश्यक कार्यवाही पूर्ण करुन अर्जदार यांना लेखी कळविण्यात यावे. असे कळविल्याचे जिल्हाधिकारी सोलापूर यांचे भ्रष्टाचाराबाबत तक्रार अर्ज मा. मुख्यमंत्री सचिवालय यांना दिलेनंतर त्या अर्जावर जिल्हा पुरवठा अधिकारी यांना निर्णय देण्याचा अधिकार असल्यास त्या नियमाची छायांकित प्रत व इतर २ मुद्यांची माहिती मागितली आहे. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी गैरहजर आहेत परंतु त्यांचे लेखी निवदेन दि. १९/०५/२०२५ रोजी आयोगाकडे सादर केले आहे. सदर लेखी निदेवनात "जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकारात मागितलेल्या अर्जानुसार माहिती दिलेली नाही तसेच प्रथम अपील अधिकारी यांनीही अपिलास कोणतेही उत्तर दिलेले नाही. संबंधित अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करावी व सदरची माहिती मोफत मिळावी," अशी विनंती आयोगाकडे केली आहे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधींनी आयोगासमोर अवगत केले की, अपिलार्थीस दि. ०४/०८/२०२३ रोजीच्या पत्राने मागणी केलेली मुद्या क्र. १ ते ३ ची माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे कळविले आहे.

उपलब्ध अभिलेखावरुन, जन माहिती अधिकारी तथा सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांनी अपिलार्थीस दि. ०४/०८/२०२३ रोजीच्या पत्राने माहिती अर्जासंदर्भात वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविल्याचे दिसून येते.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र.रामाआ /६३४६/२०२३/सोलापूर 8449/2025 दिनांक - 19/6/2025

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ